वाचले -

१) शासन निर्णय क्र.एसआरव्ही-१०९२/१०३३/प्र.क्र.३३/९२/८,दि.०२ डिसेंबर १९९७
२) मा.आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे 1 यांचेकडील पत्र क्र. आस्था-क्र/प्राथ१०६/पदभरती/१४०८/ २०२४, दिनांक २५/०२/२०२४
३) आदेश क्र.माध्य/शि/०१/कावि/४०८/२०२४ दि.२०/०६/२०२४
४) **श्रीम.अर्चना दिलेंद्र भुसारे,शिक्षणसेवक** यांचा दि.०९/०९/२०२४ रोजीचा राजीनामा अर्ज.
५) मुख्याध्यापक,मा. वि.खराळवाडी यांचेकडील पत्र क्र. २६६/२०२४ दि.०९/०९/२०२४.
६) मा. आयुक्त यांचेकडील यांचा दिनांक २७/०९/२०२४ रोजीचा मान्य प्रस्ताव .

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
माध्यमिकशिक्षणविभाग
क्र.माध्य/शि/०१/कावि/७१६/२०२४
दिनांक: २७/०९/२०२४

विषय:- **श्रीम.अर्चना दिलेंद्र भुसारे,शिक्षणसेवक** यांचा महापालिका सेवेचा राजीनामा मंजूरीबाबत...

आदेश,

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर वाचले क्र.०२ अन्वये शासनाच्या पवित्र प्रणालीमार्फत माध्यमिक शिक्षण विभागाकडे उमेदवारांची शिक्षण सेवक या पदावर निवड करणेत आलेली होती.वाचले क्र.०३ अन्वये माध्यमिक विद्यालय,खराळवाडी या विद्यालयात **श्रीम.अर्चना दिलेंद्र भुसारे,शिक्षणसेवक** यांची एकत्रित मानधन र.रू.१८०००/- (अक्षरी- अठरा हजार रूपये फक्त) नेमणूक करणेत आलेली होती.त्यानुसार **श्रीम.अर्चना दिलेंद्र भुसारे,शिक्षणसेवक** दि.२४/०६/२०२४ रोजी रूजू झालेल्या आहेत.

**श्रीम.अर्चना दिलेंद्र भुसारे,शिक्षणसेवक** यांनी उपरोक्त वाचले क्र.०४ च्या अर्जान्वये वैयक्तिक कारणास्तव दि.०९/०९/२०२४ पासून महानगरपालिका सेवेचा राजीनामा मंजूर करणेकामी विनंती केलेली आहे.त्यानुसार त्यांची दि.०९/०९/२०२४ अखेर महानगरपालिकेमध्ये ०२ महिना १६ दिवस इतकी सेवा होत आहे. **श्रीम.अर्चना दिलेंद्र भुसारे,शिक्षणसेवक** यांचा विनावेतनी रजा निरंक आहे

मुख्याध्यापक, माध्यमिक विद्यालय,खराळवाडी यांनी वाचले क्र.०५ अन्वये **श्रीम.अर्चना दिलेंद्र भुसारे,शिक्षणसेवक** यांचेकडे कोणत्याही कर्ज अथवा येणे रक्कमा नसून सद्यस्थितीत त्यांच्याविरूध्द कोणत्याही प्रकारची खातेनिहाय चौकशी चालू अथवा प्रस्तावित नसलेबाबत व राजीनामा मंजूरीबाबत स्पष्टपणे शिफारस केलेली आहे. **श्रीम.अर्चना दिलेंद्र भुसारे,शिक्षणसेवक** यांनी राजीनाम्याबाबत ०१ महिन्याची आगाऊ लेखी नोटीस न दिल्यामुळे त्यांनी खालीलप्रमाणे मनपा कोषागरात भरलेली रक्कम व पावती क्र.याचा तपशिल खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | कर्मचा-यांचे नाव, पदनाम | मनपा सेवेत रूजू दिनांक | मनपा सेवेचा राजीनामा अर्ज दिनांक व एकुण सेवा | मनपा कोषागारात भरलेली रक्कम व पावती क्र. | मनपा सेवेचा राजीनामा देण्याचे कारण |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| १ | श्रीम.अर्चना दिलेंद्र भुसारे | दि.२४/०६/२०२४ | दि.०९/०९/२०२४<br>सेवा- ०२ महिना १६ दिवस | C/१४०७<br>दि.०९/०९/२०२४<br>अन्वये<br>र.रू.१८,०००/- | कौटुंबिक अडचणीस्तव |

सबब,वाचले क्र.०१ मधील तरतुदी तसेच विभागाने केलेली शिफारस विचारात घेता मी आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्रस्तुतच्या आदेशान्वये **श्रीम.अर्चना दिलेंद्र भुसारे,शिक्षणसेवक** यांचा दि.०९/०९/२०२४ पासून ते आदेशाच्या तारखेपर्यंतचा कालावधी विनावेतनी करून शिक्षणसेवक या पदाचा महापालिका सेवेचा राजीनामा मंजूर करण्यास मान्यता देत आहे. त्याचप्रमाणे लेखा परिक्षणार्थ अन्य काही येणे रक्कम निघाल्यास ती **श्रीम.अर्चना दिलेंद्र भुसारे,शिक्षणसेवक** यांनी भरणे बंधनकारक राहील.

प्रस्तुत आदेशाची नोंद श्रीम.अर्चना दिलेंद्र भुसारे,शिक्षणसेवक यांच्या मुळ सेवानोंद पुस्तकात घेणेत यावी.

सही/-

(शेखर सिंह)

आयुक्त

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी-४११०१८

प्रति,

१) श्रीम.अर्चना दिलेंद्र भुसारे,शिक्षणसेवक

२) मुख्याध्यापक,मा.वि.खराळवाडी

प्रत,

१) प्रशासन विभाग

२) लेखाविभाग ३)मु.ले.प.विभाग ४) गोपनिय अहवाल कक्ष

५) वैद्यकीयनोंद कक्ष ६)सेवाजेष्ठता कक्ष ७) संगणक विभाग

८) संबंधित विभाग टेबल क्र.२ व ४

९) मा.आयुक्त (शिक्षण),पुणे

माहितीसाठी.

(विजयकुमार थोरात)

सहाय्यक आयुक्त

माध्यमिक शिक्षण विभाग

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी-१८.